# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 47 वा वार्षिक दीक्षान्त समारंभ

## निवेदन

- शिवाजी विद्यापीठाचा 47 वा दीक्षान्त समारंभ साधारणपणे डिसेंबर ते फेब्रुवारीच्या दरम्यान होईल. ऑक्टोबर 2009 व एप्रिल 2010 मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेमध्ये उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील. त्यांचे दीक्षान्त शुल्क त्यांच्या परीक्षा अर्जासोबत भरुन घेतले असल्यामुळे त्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज करु नये.
- ऑक्टोबर 2009 व एप्रिल 2010 या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्र स्वीकारण्याचा Inperson/Inabsentia पैकी एक Option आणि स्वतःचा Address (http://online.shivajiuniversity.in ) या इंटरनेट लिंकवर ऑनलाईन दयावा व त्याची प्रत काढून ती विद्यापीठाकडे पाठवावी किंवा समक्ष द्यावी. त्या प्रतीमध्ये नंतर कोणतीही दुरुस्ती करु नये दुरुस्ती केल्यास ती ग्राहय धरण्यात येणार नाही. ऑन लाईन देण्यात आलेला Option ग्राहय धरण्यात येईल. जे विद्यार्थी Inperson हा Option देतील, त्यांचीच पदवी प्रमाणपत्रे दीक्षान्त समारंभा दिवशी दिली जातील व जे विद्यार्थी Inabsentia हा Option देतील तसेच ज्या विद्यार्थ्यांनी कोणताही Option दिलेला नाही, त्यांची पदवी प्रमाणपत्रे दीक्षान्त समारंभाच्या एक महिन्यानंतर पोष्टाने पाठविण्यात येतील.
- 1) ऑक्टोबर 2007 व त्यापूर्वीच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- 2)Ph.D./M.Phil./M.E./M.Tech.-Declared/Awarded यांनी पदवी प्रमाणपत्र मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- 3) M.B.B.S./B.A.M.S./B.H.M.S./B.D.S./B.Sc. Nursing/ -Result Declared यांनी पदवी प्रमाणपत्र मिळण्याकरिता Internship Certificate च्या प्रतीसोबत विहित नमुन्यामध्ये विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- 4) Autonomous Institute च्या विद्यार्थ्यांनी पदवी प्रमाणपत्रे मिळण्याकरिता विहित नमुन्यामध्ये विहीत मुदतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे.
- वरील 1 ते 4 यांचेकरिता विहित नमुन्यातील दीक्षान्त अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत व शुल्क खालीलप्रमाणे आहे.

| दीक्षान्त अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत | शुल्क |
|---|---|
| ⇨ 16 ऑगस्ट 2010 पर्यत | रु. 250/– |
| ⇨ 31 ऑगस्ट 2010 पर्यत (विलंब शुल्क रु.100/–सहीत) | रु 350/– |
| ⇨ 15 सप्टेंबर 2010 पर्यत (अती विलंब शुल्क रु.600/–सहीत) | रु 850/– |

- दीक्षान्त अर्ज विद्यापीठाच्या (http://online.shivajiuniversity.in) या इंटरनेट लिंकवर ऑनलाईन भरुन त्याची प्रिंट घ्यावी. अलिकडील आयकार्ड साईज दोन फोटो, अंतिम वर्षाच्या मार्कलिस्टची प्रत आणि वरील दर्शविलेल्याप्रमाणे योग्य त्या शुल्काचा डी.डी. किंवा विद्यापीठामध्ये शुल्क भरल्याच्या पावतीसह दीक्षान्त अर्ज वरील दर्शविलेल्या मुदतीमध्येच पोहोचेल अशा बेताने विद्यापीठाकडे पाठवावा किंवा समक्ष द्यावा. मुदतीनंतरचे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत यांची नोंद घ्यावी.

**दीक्षान्त विभाग** — **डॉ. बी.एम्. हिर्डेकर**

**दि. 16/06/2010** — **(परीक्षा नियंत्रक)**